महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैंनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ ०८ जून २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक ३४० ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## मुंबई मनपाची पर्यावरणाची लढाई कागदावरच

### १०,२२४ कोटींचे पर्यावरण अर्थसंकल्प मात्र वर्षभरात केवळ १०% रक्कम खर्च

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबईत एकीकडे प्रदूषणाचा स्तर वाढत चालला असून मुंबईकरांना मोकळ्या हवेत श्वास घेणे कठीण बनले आहे तर दुसरीकडे हिरवळ घटवून ग्लोबल वॉर्मिंगमुळे ऋतुचक्रात झालेल्या बिघाडामुळे पर्यावरण सुरक्षा हे एक मोठे आव्हान ठरत आहे. पर्यावरणाच्या समस्या संपवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने राणा भीमादेवी थाटात गर्जना करत गेल्या वर्षी 10 हजार 224 कोटी रुपयांचा पर्यावरणीय अर्थसंकल्प (क्लायमेट बजेट) सादर करताना दावा केला होता की, या अर्थसंकल्पाद्वारे मुंबईमध्ये पर्यावरण समस्या आटोक्यात आणल्या जातील. मात्र गेल्या वर्षभरात पालिकेने या पर्यावरण अर्थसंकल्पातून केवळ 10 टक्के रक्कमच खर्च केली आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या समस्या सोडवण्याची पालिकेची योजना कागदावरच राहिल्याचे स्पष्ट होत असून पालिकेचे दावे किती फोल असतात, हे देखील अधोरेखित झाले आहे.



मुंबईच्या वातावरणातील प्रदूषणाचा स्तर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर मध्ये मुंबईचा एक्यूआय 300 पर्यंत पोहोचतो. त्यामुळे मुंबईकरांना मोकळ्या हवेत श्वास घेणे कठीण बनते. गेली दोन-तीन वर्षे मुंबईतील प्रदूषणाबाबत बरीच आरडाओरड झाली होती. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी गेल्या वर्षी पालिकेने 10 हजार 224 कोटी रुपयांचा पर्यावरण अर्थसंकल्प बनवला होता. पालिकेने जून 2024 मध्ये हा अर्थसंकल्प सादर करताना दावा केला होता की, ओस्लो (नार्वे), न्यूयॉर्क, लंडन नंतर मुंबई महापालिका ही अशा प्रकारचा अर्थसंकल्प बनवणारी जगातील तिसरी महापालिका बनली आहे. पालिकेने या अर्थसंकल्पाचा अहवाल बनवताना पालिकेच्या पर्यावरणाशी संबंधित 20 विभागांशी सल्लामसलत केली होती.

या अहवालात एनर्जी अँड बिल्डिंग, सस्टेनेबल वेस्ट मॅनेजमेंट, मुंबई एन्व्हायरमेंट ॲक्शन प्लॅन, अर्बन ग्रीनिंग आणि जैव विविधता, एअर क्वालिटी आणि फ्लड अँड वॉटर रिसोर्स मॅनेजमेंट सारख्या विभागांचा समावेश आहे. हे सर्व विभाग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या पर्यावरणाशी संबंधित आहेत. शास्त्रोक्त पद्धतीने ग्रीन हाऊस गॅस उत्सर्जनात घट करणे, वायु प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, पर्यावरणाला पूरक प्रक्रिया कार्यान्वित करणे, पर्यावरणाचे मूल्यांकन आणि प्रदूषणाचे नियंत्रण करणे ही उद्दिष्टे पालिकेने डोळयासमोर ठेवली होती.

## कल्याणमध्ये दुर्गाडी किल्ले परिसरात शिवसेनेचा घंटानाद आंदोलन

### किल्ल्यावर जाण्यासाठी शिंदे, ठाकरे गटाचे सैनिक आक्रमक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बकरी ईदच्या निमित्ताने प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षीही शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या वतीने कल्याणच्या दुर्गाडी किल्याजवळ घंटानाद आंदोलन करण्यात आले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने तत्कालीन जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या पुढाकाराने सुरू झालेले हे आंदोलन त्यांच्यानंतरही अद्यापही सुरु आहे.

बकरी ईदच्या दिवशी कल्याण येथील मुस्लिम बांधव एकत्रितपणे येऊन दुर्गाडी किल्याच्या परिसरात नमाज पडतात. कायदा सुव्यवस्था बिघडु नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून नमाज कार्यक्रम संपेपर्यंत कोणालाही दुर्गाडी देवीच्या मंदिरात दर्शन घेण्यासाठी सोडत नाहीत. शिवसेनेचे तत्कालीन ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांनी या घंटानाद आंदोलनाला सुरवात केली. तेव्हापासून आजतागायत दरवर्षी बकरी ईदच्या दिवशी शिवसेनेकडून हे आंदोलन करण्यात येत आहे.

यावेळी कल्याणच्या लोकमान्य टिळक चौक येथून सर्व शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांनी दुर्गाडी किल्ल्याच्या दिशेने कूच केले. मात्र पोलीस प्रशासनाने या दोन्ही गटांना लालचौकी



परिसरातच बॅरीकेट लावून रोखून धरले. ज्याठिकाणी काही काळ पोलीस आणि आंदोलकांमध्ये काही काळ धक्काबुक्कीही झाली. तर शिवसेनेच्या दोन्ही गटांकडून जोरदार घोषणाबाजीही केली जात होती. आजही सकाळी शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या वतीने घटानांद आंदोलन केले, पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले, व नंतर सोडून दिले. यावेळी आमदार विश्वनाथ भोईर यांनी सांगितले की, मुस्लिम बांधव सकाळी नमाज पडतात. शांतता राहवी म्हणजे मंदिरातील घंटा व नगारा बांधून ठेवतात आम्हाला मान्य आहे. परंतु हिंदु बांधवांना दर्शन घेण्यास मनाई करतात मंदिरा पर्यंत जाऊन देत नाही हे पोलीस प्रशासनाचे चुकीचे आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो व म्हणून आम्ही घटानांद आंदोलन प्रत्येकवर्षी करीत आहोत असे सांगितले. यावेळी आमदार राजेश मोरे, जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, निलेश शिंदे, विजया पोटे, छाया वाघमारे, माजी परिवहन सदस्य सुनील खारूक, शिवसेना उपशहर संघटक विलास रंदवे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांनी सांगितले की, जर हे सरकार हिंदुत्ववादी आहे तर मग एका समाजाला न्याय व दुसऱ्या समाजावर अन्याय होत आहे. हया सरकारचा आम्ही निषेध व्यक्त करतो. हे हिंदुत्ववादी सरकार नाही तर बेगडी सरकार असल्याची टीका विजय साळवी यांनी केली. आम्ही लेखी पत्र पोलीस प्रशासनाला दिले होते दर्शन परवानगी साठी परंतु पोलीस प्रशासनाने काहीही उत्तर दिले नाही असे सांगितले. यावेळी साईनाथ तारे, धनंजय बोडारे, शरद पाटील, बाळा परब, यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## किन्हवली भात गिरणी संस्थेच्या अध्यक्षपदी विनायक धानके

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तालुक्यातील किन्हवली विभाग शेतकरी सहकारी भात गिरणी संस्थेच्या अध्यक्षपदी जेष्ठ नेते विनायक कृष्णाजी धानके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेची पंचवार्षिक संचालकपदाची निवडणूक मागील महिन्यात १४ मे रोजी झाली होती. त्यानंतर निवडून आलेल्या संचालकांमधून अध्यक्ष, उपाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना शिंदे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी किन्हवली येथे पार पडली. या निवडणूकीत अध्यक्षपदासाठी विनायक धानके तर उपाध्यक्षपदासाठी वसंत विशे या दोघांचेच अर्ज आल्याने अध्यक्षपदी धानके तर उपाध्यक्षपदी विशे यांना बिनविरोध घोषित करण्यात आले. किन्हवली सहकारी भात गिरणी ही जिल्ह्यातील अग्रगन्य संस्था आहे. या संस्थेचे किन्हवली परिसरातील ३० गावे, पाड्यांतील एकुण ५७०० सभासद आहेत. या प्रतिष्ठीत संस्थेच्या अध्यक्षपदी विनायक धानके हे सलग सहाव्यांदा अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. त्यांच्या कारकिर्दीत संस्थेची भरभराट झाली असुन यावर्षी विक्रमी नफा १० लाख २७ हजार ४८४ रुपये इतका झाला आहे. धानके यांनी सहाव्यांदा विजय मिळविल्याने त्यांच्यावर तालुक्याच्या सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रोहा येथील शिवसृष्टीचे मंत्री अदिती तटकरेंच्या हस्ते लोकार्पण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रोहा-अष्टमी नगर परिषदेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदिप्यमान इतिहासाची आठवण करून देणाऱ्या 'शिवसृष्टी' या भव्य प्रकल्पाचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री कु. अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या शिवसृष्टीमध्ये स्वराज्याचे स्वप्न साकार करणाऱ्या किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारण्यात आल्या असून, त्यातून महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि धैर्याचे दर्शन घडते. "हे किल्ले केवळ स्थापत्य नव्हे, तर स्वाभिमान, स्वतंत्रता आणि मराठी अस्मितेचे प्रतीक आहेत," असे प्रतिपादन कु. तटकरे यांनी यावेळी केले.कार्यक्रमाला खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, नगरपरिषद मुख्याधिकारी अजयकुमार एडके, तसेच संतोष पोटफोडे, मधुकर पाटील, समीर शेडगे, विनोद पाशीलकर, सुरेश मगर, महेश कोलटकर आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसृष्टीच्या माध्यमातून नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास कु. तटकरे यांनी व्यक्त केला.

## महावितरणची 'शून्य अपघात महाराष्ट्र' संकल्पना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेत राज्यभरात १ ते ६ जूनदरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे. सप्ताहाच्या शेवटच्या




दिवशी शुक्रवारी (ता. ६) कल्याण परिमंडल, चार मंडल कार्यालये, १० विभाग कार्यालये तसेच ४० उपविभागीय आणि १८१ शाखा कार्यालयांत चार हजार १८१ नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी वीज सुरक्षेची शपथ घेतली. यात दोन हजार ६४२ नियमित कर्मचारी तर एक हजार ५३९ कंत्राटी कामगारांचा समावेश आहे.

## बदलापूरात निविदांमध्ये भ्रष्टाचार

### संदेश ढोणेंचा उपोषणाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाने (एमएसआयडीसी) २०२३-२४ मध्ये काढलेल्या १५० ठेकेदार निविदांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, नियमभंग आणि संगनमताचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या कामांशी संबंधित असून, या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद पालघरचे बांधकाम व आरोग्य समितीचे सभापती संदेश ढोणे १० जूनपासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. मार्च २०२४मध्ये एका वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या ई-निविदा सूचनेंतर्गत राज्यभरातील १५० विकासकामांसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये सहभागी ठेकेदारांची पात्रता, लखोटे उघडण्याची पद्धत आणि अंतिम कामांचे वाटप या सर्वच टप्प्यांवर गंभीर प्रकारचे नियमभंग आणि अपारदर्शकता दिसून आल्याचा दावा केला आहे. एक हजार कोटी रुपये किमतीच्या कामांसाठी पात्र ठेकेदारांना अपात्र ठरवण्यात आले आणि २०० ते ३५० कोटींच्या कामांसाठी अपात्र ठेकेदारांना निविदेतून काम दिल्याचे ढोणे यांनी समोर आणले. त्यात महत्त्वाचे म्हणजे शनिवारी (सुट्टीच्या दिवशी) तांत्रिक लखोटा उघडण्यात आला आणि त्याच दिवशी १०-१५ मिनिटांच्या आत आर्थिक लखोटाही उघडण्यात आला, तेही कोणतीही पूर्वसूचना न देता. जवळपास सर्व निविदा ४ ते ४.९९ टक्के अधिक दराने मंजूर करण्यात आल्या. सरकार निर्णय १२ एप्रिल २०१७ आणि २७ सप्टेंबर २०१८ मधील सर्व निकष व अटी पायदळी तुडवण्यात आल्याचे ढोणे यांनी म्हटले आहे. विनय फडणीस नावाच्या गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला नियुक्त करून ठेकेदारांकडून १० ते १२ टक्के कमिशन स्वरूपात वसुली केल्याचा आरोप, बनावट बँक खाती उघडून, काही ठेकेदारांचे धनादेश या खात्यांत वटवून वैयक्तिक आर्थिक फायदा घेतल्याचा ठोस पुरावा असल्याचा दावाही ढोणे यांनी केला आहे. दुर्लक्षित पत्रव्यवहार संदेश ढोणे यांनी ३ फेब्रुवारीपासून पाच वेळा पत्र लिहून आणि वैयक्तिकरित्या भेटून निविदा प्रक्रियेबाबत माहिती मागवली. मात्र, एमएसआयडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कुठलाही प्रतिसाद देण्यात आलेला नाही. त्यामुळे या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवण्यासाठी १० जूनला आझाद मैदानात उपोषणाला बसणार असल्याचे ढोणे यांनी सांगितले.

याबाबत नगरपालिकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही

## मुरबाडमध्ये लवकरच मेडिकल कॉलेज

### - आमदार किसन कथोरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड नगरपंचायतच्या नुकत्याच झालेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत ज्या नगरसेवकांनी पक्षाशी बेईमानी केली त्यांना योग्य वेळी धडा शिकवणार असा सज्जड ईशारा आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात दिला. आमदार कथोरेंचा चष्मा जेव्हा खाली जातो तेव्हा भल्या भल्यांचा करेक्ट कार्यक्रम होतो हे सर्वांना माहित आहे.गद्दारी करणार्यांचा हिशोब चुकता करेन अशा कडक शब्दात




आमदार कथोरे यांनी फुटिर नगरसेवकांना फटकारले आहे. लायकी नसणाऱ्यांना मोठ मोठी पदं दिली याची त्यांना जाण नसून यापुढे जो पक्षाचे निष्ठेने काम करेल त्याला न्याय मिळेल. मुरबाड नगरपंचायत मधील एकूण 17 प्रभागांची तयारी सुरु केली असुन फुटलेल्या नगरसेवकांचा पुढील निवडणूकीत करेक्ट कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले.

यावेळी आमदार कथोरे यांनी मुरबाड तालुक्यात नव्याने होणार्या विकास कामांवर चर्चा केली असुन मुरबाड मधील पोटगाव येथे शंभर बेडच्या हॉस्पिटलसह मेडिकल कॉलेज सुरु करणार असल्याची घोषणा केल्याने तालुक्यासाठी खूप मोठी बाब असून तालुक्यातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची भटकंती थांबणार आहे. तसेच माळशेज घाटातील काचेचा स्काय वॉक दृष्टिक्षेपात आला असून अर्थ संकल्पात मुरबाड साठी पहिल्यांदा तरतूद झाली असल्याचे सांगितले.

या मेळाव्यासाठी नितीन मोहपे, दिपक पवार, जितेंद्र भावार्थे, अनिल घरत,सुधीर तेलवणे,मोहन सासे, मुकेश विशे, संतोष पवार,दिनेश उघडे,रविंद्र देसले, जगन माळी, स्वरा चौधरी, ज्योती गोडांबे,मानसी देसले,मनोज देसले यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.









# गीतासार



**अध्याय १३**
**क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः**

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् । सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३-१३ ॥

ते सर्व बाजूंनी हात-पाय असलेले, सर्व बाजूंनी डोळे, डोकी व तोंडे असलेले, तसेच सर्व बाजूंनी कान असलेले आहे. कारण ते विश्वात सर्वाला व्यापून राहिले आहे. ॥ १३-१३ ॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् । असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १३-१४ ॥

ते सर्व इंद्रियांच्या विषयांना जाणणारे आहे. परंतु वास्तविक सर्व इंद्रियांनी रहित आहे. ते आसक्तिरहित असूनही सर्वांचे धारण-पोषण करणारे आणि निर्गुण असूनही गुणांचा भोग घेणारे आहे. ॥ १३-१४ ॥

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च । सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥ १३-१५ ॥

ते चराचर सर्व प्राणिमात्रांच्या बाहेर व आत परिपूर्ण भरले आहे. तसेच चर आणि अचरही तेच आहे आणि ते सूक्ष्म असल्यामुळे कळण्याजोगे नाही. तसेच अतिशय जवळ आणि दूरही असलेले तेच आहे. ॥ १३-१५ ॥

# सनातन राष्ट्र स्थापनेसाठी नवी दिशा आणि जागृती निर्माण करणारा शंखनाद !

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात देशभरातून आलेले साधक, विचारवंत, संत आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक यांनी एकत्र येत 'सनातन राष्ट्र' स्थापनेचा संकल्प पुन्हा एकदा दृढ केला. शतचंडी यज्ञ, धर्मध्वज आरोहण, युद्धकलेची प्रात्यक्षिके, संतांचे मार्गदर्शन आणि विचारवंतांचे राष्ट्ररक्षणविषयक विचार या सर्वांनी महोत्सवाला केवळ आध्यात्मिक नव्हे, तर वैचारिक आणि कृतीशील अधिष्ठान दिले. या शंखनादाने साधकांच्या मनात 'वैयक्तिक साधनेसमवेतच समाजरक्षणासाठी आवश्यक असलेली समष्टी साधनाही महत्त्वाची आहे', ही जाणीव निर्माण केली. विशेषतः युवाशक्तीला शौर्य, स्वसंरक्षण आणि देशभक्ती यांचा नवा मंत्र मिळाला. आज देश सांस्कृतिक संघर्षाच्या उंबरठ्यावर उभा आहे. अशा काळात हा महोत्सव म्हणजे एक चैतन्यदायी ज्योत आहे, जी प्रत्येक हिंदूंच्या मनात धर्म, संस्कृती आणि राष्ट्र यांसाठी सज्ज रहाण्याचे तेज जागवत आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून चालू झालेले विचारमंथन हेच खरे याचे फलित आणि रामराज्याच्या दिशेने उचललेले दृढ पाऊल ठरणार आहे !

**समाजातील व्यापक प्रभावाचे प्रतीक ! :** या महोत्सवाला २३ देशांतील ३० हजारांहून अधिक साधक आणि हिंदु धर्मप्रेमी उपस्थित होते. गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, भाग्यनगर येथील हिंदुत्वनिष्ठ आमदार टी. राजा सिंह, गोव्याचे आरोग्यमंत्री श्री. विश्वजित राणे, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, गोव्याचे वीजमंत्री श्री. सुदीन ढवळीकर, भाजपचे गोवा राज्याचे प्रदेशाध्यक्ष श्री. दामोदर नाईक आदी राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह गोवा येथील कुंडई येथील दत्त पद्मनाभ पीठाचे पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंद स्वामीजी, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पू. देवकीनंदन ठाकूर, कर्नाटक येथील म्हैसूर राजघराण्याचे युवराज, तसेच म्हैसूरचे खासदार श्री. यदुवीर कृष्ण दत्त चामराज वाडीयार, 'सुदर्शन न्यूज'चे मुख्य संपादक श्री. सुरेश चव्हाणके आदी मान्यवर उपस्थित होते. सनातन धर्माच्या कार्यक्रमांना राजकीय पाठिंबा मिळणे, हे त्याच्या समाजातील व्यापक प्रभावाचे प्रतीक आहे.

**सनातन राष्ट्र स्थापनेसाठीची वैचारिक बैठक ! :** सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात विचारवंत, संत, धर्मगुरु यांच्या भाषणांतून सनातन विचारांचे राष्ट्र स्थापन करण्यासाठीची वैचारिक बैठक मजबूत झाली. उपस्थितांनी कृतीशील राष्ट्रनिष्ठ साधनेसाठी कटिबद्ध रहाण्याचे संकल्प केले. युद्धकलेच्या प्रात्यक्षिकांमुळे युवक-युवतींमध्ये स्वसंरक्षण, शौर्य आणि सज्ज रहाणे याची जाणीव निर्माण झाली. शास्त्रासमवेतच शस्त्रसज्जता हेही धर्मरक्षणाचे महत्त्वाचे अंग असल्याचे अधोरेखित झाले. गोरक्षण, गुरुकुल व्यवस्था, पारंपरिक विधी, सनातन आचारधर्म यांची आवश्यकता पुनः अधोरेखित झाली. अनेक सहभागी संस्थांनी पुढील कृतीसाठी सहकार्य आणि समन्वय यांचे आराखडे सिद्ध करण्याचा निर्धार केला. 'सुदर्शन न्यूज'सारख्या माध्यमांनी ही चळवळ व्यापक स्तरावर पोचवण्याचा संकल्प केला. सोशल मिडिया आणि वृत्तमाध्यमे यांतून महोत्सवाची चर्चा चालू झाली, ज्यातून 'हिंदु राष्ट्र' ही धारणा मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न दिसत आहे.

**जनतेच्या मनातील ध्येय ! :** या महोत्सवाने एक गोष्ट सिद्ध केली की, 'सनातन राष्ट्र' ही संकल्पना आता केवळ विचारधारा न रहाता, ती जनतेच्या मनातील ध्येय बनत आहे; कारण जिथे न्यायालयात ज्ञानवापी, श्रीकृष्ण जन्मभूमीचे खटले चालू आहेत, वक्फ बोर्डाच्या असीमित शक्तींवर गदा आणणारे सुधारक विधेयक संसदेत संमत झाले आहे, काही राज्यांनी समान नागरी कायदा लागू करण्यास आरंभ केला आहे, हे सर्व सनातन राष्ट्राच्या दिशेने झपाट्याने पडत असलेली पावलेच आहेत.


**छत्रपतींच्या शौर्याची आणि रणनीतीची आठवण ! :** गोवा येथे झालेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चा एक ठळक भाग होता छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ आणि प्राचीन शस्त्रांचे प्रदर्शन. हे शस्त्रप्रदर्शन पहातांना प्रत्येक उपस्थिताच्या मनात छत्रपतींचे शौर्य आणि रणनीती यांची आठवण जागृत झाली. आजच्या काळात जेथे आंतरराष्ट्रीय आणि धार्मिक कट्टरपंथी भारतावर आक्रमणे करत आहेत, तेथे छत्रपतींच्या रणकौशल्याचा आणि शौर्याचा आदर्श 'सनातन राष्ट्र' स्थापन करण्यासाठी बळ देणारा ठरला.

**हिंदवी स्वराज्याच्या नवयुगाचा आरंभ ! :** सनातन संस्था सनातन हिंदु संस्कृतीचे संवर्धन आणि राष्ट्ररक्षण यांसाठी सतत प्रयत्नशील आहे. भारताचा विजय व्हावा आणि पृथ्वीवरील एकमेव सनातन राष्ट्र असलेल्या भारताचे रक्षण व्हावे, यासाठी सनातन संस्थेच्या वतीने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या पावन भूमीत 'शतचंडी यज्ञा'चे आयोजन केले होते. येथे झालेला वैचारिक शंखनाद म्हणजे हिंदूंना आत्मविश्वास, दिशा आणि उद्दिष्ट मिळवून देणारा रणघोष ठरला. हा केवळ महोत्सव नसून हिंदवी स्वराज्याच्या नवयुगाचा आरंभ आहे.

**प्रभु श्रीरामांच्या धर्मयुद्धाचा संदेश ! :** बांगलादेशात सरकारविरोधी आंदोलनात हिंदूंनाच मारण्यात आले. काश्मीर, केरळ आणि बंगाल येथून हिंदूच संपत चालले आहेत. पहलगाम येथेही धर्म विचारून हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. प्रत्येक ठिकाणी हिंदूंनाच लक्ष्य केले जात आहे. अशा वेळी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आपल्याला प्रभु श्रीरामांच्या धर्मयुद्धाचा संदेश देतो. धर्म, धैर्य आणि एकतेनेच राष्ट्र आणि संस्कृती वाचू शकते. आजच्या काळातील आतंकी आणि कट्टरवादी यांच्यामुळे निर्माण झालेले धोके तोंड देण्यासाठीही या दिव्य उर्जेची आवश्यकता भासते. जी ऊर्जा या महोत्सवातून मिळाली.

हॉलंडमधील भविष्यवेत्ता पीटर हर्कोस यांनी 'भारतात सनातन धर्माचा शंखनाद होईल आणि अध्यात्मामुळे तो विश्वगुरु बनेल', अशी भविष्यवाणी केली होती. या महोत्सवामुळे गुरुदेवांच्या संकल्पाने कार्य सिद्धीस जाणार आहे आणि 'भारत लवकरच विश्वगुरु होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे', याची आता सर्वांना निश्चिती झाली आहे. सनातन राष्ट्राचा हा दिव्य मार्ग प्रकाशमान रहावा आणि भारत हा धर्मध्वज उंचावत जागतिक पातळीवर पराक्रमशाली राष्ट्र म्हणून उभा रहावा, यासाठी प्रत्येक हिंदु सज्ज व्हावा, हीच गुरुचरणी प्रार्थना !

- श्री. चेतन राजहंस
राष्ट्रीय प्रवक्ते, सनातन संस्था.
(संपर्क : ७७७५८५८३८७)



# जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात!

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का ? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का ? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का ? आणि सगळयात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मेघडंबरीसह बैठकरुपी पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवलीतील मानपाडा रोड येथील शिवसेना मध्यवर्ती शाखेच्या परिसरात बहुप्रतिक्षित "छत्रपती शिवाजी महाराजांच्या मेघडंबरीसह बैठकरूपी पूर्णाकृती पुतळयाचा भव्य असा अनावरण सोहळा" गुरुवारी संपन्न झाला. कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्याहस्ते हे अनावरण करण्यात आले. या सोहळयानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. यात पोवाडा गायन, देशभक्तिपर गीतसंगीत, शौर्यप्रदर्शन तसेच पारंपरिक ढोल-ताशा वादन यांचा समावेश होता.

या वेळी सुप्रसिद्ध गायक अभिजित जाधव आणि आमु जाधव यांनी संयुक्त सादरीकरण करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांचे सादरीकरण कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा सर्व डोंबिवलीवासियांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, भाजपा आमदार रवींद्र चव्हाण, सुलभा गायकवाड, शिवसेना आमदार राजेश मोरे, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, भाजपा जिल्हाध्यक्ष नंदू परब, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्यासह कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बैठक पुर्णाकृती पुतळयाची उंची १.२० मी. (४ फुट) असून मेघडंबरीची उंची ३.२० मी. (१० फुट ६ इंच) १.७६० मी. (५ फुट ९ इंच) इतकी आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाचे वजन ६२५ किलो असून मेघडंबरीचे वजन १२५० किलो असे एकूण वजन १८७५ किलो आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा मेघडंबरीसह पूर्णाकृती बैठक पुतळा उभारणे कामाची अंमलबजावणी महापालिकेमार्फत करण्यात आली असून या कामाच्या सुशोभिकरणाच्या अंतर्गत डेकोरेटीव संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. भिंतीस स्टोन क्लॅडींग व लोखंडी नक्षीदार ग्रिलचा समावेश करण्यात आला आहे. तसेच पुतळयाच्या करिता पेडेस्टल बांधण्यात आले असून डेकोरेटीव स्टोन फ्लोरिंगचा समावेश करण्यात आला आहे.

# रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते राजनंदिनी सावंत हिचा सत्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली(शरद शहाणे) : डोंबिवली शहरातील रॉयल इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी कुमारी राजनंदिनी सावंत हिने सीबीएसई परीक्षा मंडळाने घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत ५०० पैकी ४९९ गुण मिळवून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान मिळविला आहे. राजनंदिनीच्या या उत्तुंग भरारीबद्दल भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष आणि डोंबिवली विधानसभेचे स्थानिक भाजप आमदार रवींद्र चव्हाण यांनी राजनंदिनी सावंत हिचे कौतुक करून पुढील यशस्वी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राजनंदिनीच्या यशात तिच्या आई वडिलांचाही मोलाचा वाटा असल्याने कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांचेही कौतुक केले. याशिवाय राजनंदिनीला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही या यशात मोलाचे योगदान असल्याने कार्याध्यक्ष चव्हाण यांनी त्यांचाही शब्दसुमनांनी गौरव केला.

'डोंबिवली जशी साहित्यिक, सांस्कृतिक नगरी आहे. तशी ती विद्यानगरीही आहे. इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेच्या गुणवत्ता यादीत झळकण्याची डोंबिवली शहराची जुनी परंपरा आहे. तिच परंपरा या शहरातील पालक, शिक्षक, शाळा चालकांच्या सहकार्याने राजनंदिनीसारखे गुणवंत विद्यार्थी पुढे चालू ठेवत आहेत. ही अखंडित परंपरा पुढे चालू ठेवणे हे खूप कौतुकास्पद आहे. राजनंदिनीच्या यशामुळे डोंबिवली शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. राजनंदिनीचा हाच यशाचा, गुणवंतपणाचा वारसा येणारी शाळकरी पुढे नेईल, डोंबिवली शहराचे नाव उज्जवल करील, असा विश्वास आहे, अशा शब्दात कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या यशाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.

सखोल अभ्यास, कष्ट, जिद्द, चिकाटी, ध्येय आणि सातत्य या जोरावर राजनंदिनी सावंत हिने हे यश प्राप्त केले आहे. इतर विद्यार्थ्यांनीही हेच गुण प्राप्त करून आपली शैक्षणिक वाटचाल करावी, असे आवाहन चव्हाण यांनी केले.

# पडघा येथे शासकीय दाखले वाटप शिबीर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील शासकीय दाखले वाटप शिबीरास विद्यार्थ्यांचां उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दहावी नंतर महाविद्यालय व इतर आस्थापनातील प्रवेशासाठी लागणाऱ्या शासकीय दाखल्यासांठी विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे व तहसीलदार कार्यालय भिवंडी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजस्व अभियान अंतर्गत दाखले वाटप शिबीर शुक्रवारी ग्रामसचीवालय सभागृहात आयोजित करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे सरपंच रविंद्र विशे यांच्या हस्ते करण्यात आले या शिबीरास विद्यार्थ्यांचां व नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला यावेळी १ वर्ष उत्पन्न दाखल्यासाठी १०२ , तीन वर्ष उत्पन्न दाखल्यासाठी ३६ , नॉन क्रीमीलेयर साठी १२, डोमिसाईल १९ स्थानीक रहीवाशी ३,जेष्ठ नागरीक ३,अशा एकुण १७५ जंणानी दाखल्यासांठी लाभ घेतला तर विद्यार्थ्यांना एकाच छताखाली विवीध दाखल्यासांठी सुवीधा मिळाल्याने समाधान व्यक्त केले. यावेळी पडघा मंडळ अधीकारी संतोष आगीवले तलाठी एन. पी. तुगावे, रोहन पवार, विजय लोहकरे कोतवाल महेश थोरात, सारीका जाधव जयंत गायकवाड उपस्थित होते.

# रेसिपी

## दम आलू



**साहित्य :** मध्यम आकाराचे बटाटे, अगदी बारीक चिरलेला कांदा, आलं लसूण पेस्ट, टोमॅटो प्युरे, अगदी बारीक किसलेलं पनीर, बदाम्+पिस्ते+काजू ह्यांची भरड पूड, बेदाणे, किंचीत वेलदोड्याची पावडर, काजू पावडर (ऐच्छिक), फ्रेश क्रिम, कसुरी मेथी, कोथिंबीर, हिरवी मिरची, आलं एकत्र ठेचून.

फोडणीकरता आणि मसाले- तेल, हळद, लाल तिखट, बटर चिकनचा मसाला (ऐच्छिक), मीठ.

**कृती:** मध्यम साईझचे बटाटे धुवून घेऊन मावेत किंवा गॅसवर अगदी ५ मिनिटं उकडून घ्यावेत. एका बाजूचा आडवा टवका काढून आत पोखरुन घ्यावेत. हे झालं की पनीर अगदी बारीक किसून त्यात बदाम्+पिस्ते+काजू ह्यांची भरड पावडर, एकत्र ठेचलेलं आलं मिरची, किंचीत वेलदोड्याची पावडर, बेदाणे, मीठ सगळं एकत्र कुस्करुन पोखरलेल्या बटाट्यात दाबून बसवावं आणि हे बटाटे अगदी कमी तेलावर शॅलो फ्राय करुन बाजूला ठेवावेत.

पॅनमध्ये तेल गरम करुन त्यावर अगदी बारीक चिरलेला कांदा घालून त्यावर आलं लसूण पेस्ट, हळद, लाल तिखट आणि वर लिहिलेला बटर चिकनचा मसाला परतून घेऊन त्यावर टोमॅटो प्युरे घालावी. हवं असल्यास ह्यात १ चमचा बटर घालू शकता. मी रवाळ टेक्श्चर्करता एक दोन चमचे काजू पावडरही घालते. ह्यात आता फ्रेश क्रिम घालून एक उकळी काढावी आणि त्यात बटाटे घालून वरुन कसुरी मेथी, कोथिंबीर वगैरे घालून बारीक गॅसवर शिजू द्यावं. पनीर आणि ड्रायफ्रूट मिक्स उरलं असल्यास तेही घालावं नाहीतर ते पराठ्यात वगैरे ढकलावं.

# आजचे राशिभविष्य



**मेष**
ऑफिसमध्ये एखाद्या प्रोजेक्टचे नेतृत्व तुम्हाला करावे लागेल किंवा व्यवसायात महत्त्वाची डिल होण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल.

**वृषभ**
कामात फोकस ठेवा तसेच कागदपत्रे व्यवस्थित तापसून पाहा.आज असे काही निर्णय घ्यावा लागू शकतो जो इतरांसाठीही महत्त्वाचे असतील.

**मिथुन**
तुमची उपस्थिती तसेच तुमचे मत गांभीर्याने घेतले जाईल. ही वेळ आत्मविश्वासाने पुढे जाण्याची आहे. तुमच्यात अहंकार वाढू शकतो त्याकडे दुर्लक्ष करा.

**कर्क**
गर्व केल्यामुळे काहीही साध्य होत नाही. घरात तुमचे वजन वाढेल आणि घरातील अनेक कामे तुम्ही मार्गी लावाल.तुम्ही खूप जास्त भावनिक होणार आहात.

**सिंह**
एखाद्या जवळच्या व्यक्तीसोबत मनातलं बोलण्याची संधी मिळेल, ज्यामुळे नातेसंबध अधिक दृढ होतील त्याचबरोबर तुम्हाला मानसिक समाधान मिळेल.

**कन्या**
काही कामांमध्ये संभ्रम किंवा निर्णय घेण्याची अडचण होवू शकत अशावेळी तुमचे मन काय सांगते ते ऐका तुम्हाला नक्की मार्ग सापडेल.

**तूळ**
प्रेमसंबंधात नाते अधिक मधुर होईल, एकमेकांना जास्त वेळ देण्याचा प्रयत्न करा. विचारांनी लोकांचं लक्ष वेधून घेणार आहात.उत्तम यश मिळेल.

**वृश्चिक**
तुमचे मत किंवा विचार तुम्ही चांगल्या प्रकारे इतरांना समजावून सांगणार आहात. मित्रांशी किंवा सहकाऱ्यांशी मोकळ्या मनाने संवाद साधा. संवाद

**धनु**
साधल्यामुळे तुमचा मानसिक ताण कमी होईल. एखादा जुना प्रोजेक्ट पुन्हा तुमच्याकडे येवू शकतो त्याचा स्विकार करा.उद्दिष्टांवर ठाम राहावं लागेल.

**मकर**
व्यावहारिक काम आणि कागदपत्रांशी संबंधित मुद्दे समोर येतील, तुम्ही घाबरु नका. व्यवस्थित समजून घ्या आणि मार्गक्रमण करा. कामे संथ गतीने होतील.

**कुंभ**
घरात वातावरण ठिक असेल. नोकरी किंवा व्यवसायात काही अडचणी येवू शकतात.तुम्हाला अनेक बदलाचा सामना करावा लागू शकतो.

**मीन**
बदल सकारात्मक आहेत त्याचा स्विकार करा. काही नवीन लोकांना भेटण्याचा विचार करू शकता. नवीन संधी मिळाली तर त्याचा लाभ घ्या.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली,कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
बारावीनंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
-बीएएमएमसी-
(बॅचलर ऑफ मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून बारावी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in
MASS MEDIA

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

## शिवसेनेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांना 'आदित्य गौरव' पुरस्काराने गौरव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पेण तालुक्यातील दहावीतील प्रत्येक विभागातील जास्तीत जास्त टक्केवारीने उत्तीर्ण झालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांना आदित्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पेण तालुक्यातील हमरापूर, जिते,वाशी शिहू,वडखळ या पाच विभागातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा यात समावेश करण्यात आला होता. शिवसेना उध्दव बाळासाहेब गटाचे पेण तालुका प्रमुख समीर म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यत आले. यावेळी तालुका प्रमुख समीर म्हात्रे यांनी दहावीमध्ये उज्वल यश प्राप्त केल्यानंतर त्यांना आपल्या पुढील शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सदर गौरवाने सन्मानित करण्यात आले आहे असे सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी प्रसाद भोईर नरेश गावंड, दर्शना जवके, नंदू मोकल, दीपक पाटील, वसंत म्हात्रे, कांचन थळे, निलेश म्हात्रे, चेतन मोकल शिवसेनेचे प्रत्येक विभागाचे विभाग प्रमुख आणि शिवसैनिक उपस्थित होते.

## आमदार राजेश मोरेंच्या हस्ते कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचे भुमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली गांधीनगर येथील जनरल अरुण कुमार वैद्य चौकात आयकॉन हॉस्पिटल ते पी एन टी कॉलनी हनुमान मंदिर पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटमेंट करण्याचे भूमिपूजन सोहळा दिनांक सात जून 2025 रोजी सकाळी साडेदहा वाजता संपन्न झाला.

गांधीनगर येथील स्थानिक नागरिक आणि माजी नगरसेवक पंढरीनाथ पाटील,



सौ दिपाली स्वप्नील पाटील यांच्या अनेक दिवसाच्या मागणीनुसार लोकप्रिय खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे आणि आमदार राजेश पाटील यांच्या प्रयत्नाने एम एम आर डी ए च्या माध्यमातून सात कोटी रुपये निधी मंजूर करून आज या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण भूमिपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी त्या कार्यक्रमात माजी नगरसेवक पंढरीनाथ पाटील, सौ. दिपाली स्वप्निल पाटील, अमित बनसोडे उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख सोहम कोल्हे, ज्ञानेश्वर राठोड, संभाजी राठोड, प्रशांत सोमवंशी, नीलम अजमेर विभाग संघटक, मंदा बोरगे संघटक सौ. लक्ष्मी मोहिंदकर शिक्षिका आणि पर्यावरण असे अनेक कार्यकर्ते स्थानिक नागरिक उपस्थित होते.

या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण होत असल्याने स्थानिक नागरिकांनी आमदार राजेश मोरे यांना पुष्पगुच्छ देऊन समाधान व्यक्त केले

## पेंढारकर संस्थेने किंवा अध्यक्षांनी कधीही प्रशासकावर दबाव आणला नाही - हर्षल लवंगारे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासनाने केवी पेंढारकर स्वायत्त महाविद्यालयावर प्रशासकाची नियुक्ती केली असून महाविद्यालयावर आपल्या मर्जीतला प्रशासक नेमण्यासाठी डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर देसाई दबावतंत्राचा वापर करत असल्याचा आरोप सेव्ह पेंढारकर मोहिमेचे रोहिदास सुरवसे यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्री चंद्रकांत पाटील, सचिव वेणुगोपाल रेड्डी, शिक्षण संचालक उच्च शिक्षण डॉ. शैलेन्द्र देवळणकर यांना पत्र देत केला होता. याबाबत पेंढारकर संस्थेने किंवा अध्यक्षांनी कधीही प्रशासकावर दबाव आणला नाही असा दावा डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षल लवंगारे यांनी पत्राद्वारे केला आहे.

दिनांक २९-०४-२०२५ सायंकाळी ३.३३ मिनिटांपासून पेंढारकर महाविद्यालयावर प्रशासक नेमण्यात आला आहे. ती नेमणूक कशी चुकीची आणि बेकायदेशीर आहे त्याबद्दल संस्थेने न्यायालयात त्यांच्या अधिकारानुसार दाद मागितली आहे. संस्थेचे म्हणणे जेव्हा असे आहे की, प्रशासक नियुक्तीचे काही सबळ कारणच नाही तेव्हा "मर्जीतील प्रशासक" आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. संस्थेने किंवा संस्थेच्या अध्यक्षांनी कोणत्याही प्रकारे कधीही प्रशासकावर दबाव आणला नाही. संस्थेचा न्यायालयावर पूर्ण विश्वास असल्याचे डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षल लवंगारे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

## टीओडी मीटरला विरोध अंबरनाथमध्ये कॉंग्रेसचे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : केंद्र शासनाच्या आरडीएसएस या योजनेअंतर्गत टीओडी मीटरजोडणीचे काम सध्या शहरभर सुरू आहे. अंबरनाथमधील नागरी आणि रहिवासी सोसायट्यांमध्ये ही मीटरजोडणी सक्तीने सुरू आहे. शासनाच्या या टीओडी मीटरला विरोध करत अंबरनाथमध्ये



कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (ता. ६) आंदोलन करण्यात आले. या वेळी कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी रोहित कुमार प्रजापती, नंदू देवडे, महिला सचिव अनिता जाधव-प्रजापती तसेच पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, कृष्णा पाटील यांनी महावितरणाच्या कार्यकारी अभियंता अलका कावले यांची भेट घेत त्यांना टीओडी मीटर सक्तीने लावण्यात येऊ नये यासाठी निवेदन दिले.

## अपघातग्रस्त गाडीत कुजलेल्या अवस्थेत मृतदेह

**■ चार पाच दिवसांपुर्वी झाला असावा अपघात ■ पोलिसांचा निष्कर्ष**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर तालुक्यातील उंबर माळीतील एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका कार मध्ये आढळून आलेत कुजलेल्या अवस्थेत तीन मृतदेह. चार-पाच दिवसांपुर्वी अपघात झाला असल्याची बाब समोर आली आहे. एका गुरे चारणाऱ्या महीलेच्या ही बाब निदर्शनास आलीय. सदर महीला अपघात झालेल्या कार जवळ गेल्यावर दुर्गंधी येते असल्याने तीने गावातील लोकांना कळविले. घटनास्थळी पोलिस कर्मचाऱ्यांची धाव घेत पाहणी केली. शहापूर तालुक्यातील उंबरमाली येथे मुंबई नाशिक महामार्गावर मुंबई हून नाशिक च्या दिशेने जाणाऱ्या महामार्गावर एक कार नाल्यातील झाडाझुडपा पडलेल्या अवस्थेत आढळून आली. या कारचा अपघात चार ते पाच दिवसांपुर्वी झाला असावा. एक महीला आपली गुरे चारण्यासाठी उंबरमाली येथील गेली होती. गुरे चारत असताना तिचे लक्ष झाडाझुडपात पडलेल्या कार कडे गेले. तिने जवळ जाऊन बघीतले तर या कार मधून दुर्गंधी येते होती. जवळच असलेल्या उंबरमाली गावील ग्रामस्थांना बोलावून घेतले व कसारा पोलीसांना याची माहिती दिली. पोलिसांसह आपत्ती व्यवस्थापनाचे सदस्य घटनास्थळी दाखल



होऊन त्यांनी कारची तपासणी केली असता या कार मध्ये तीन मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आले.

एम एच ०२ बी वाय ८७०६ या नंबरची ही कार असून तीची माहिती पोलिसांनी घेतली असता ही कार मुंबई अंधेरी खार येथील असल्याचे समजले. यावरून पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. या कारमध्ये प्रवीण कुमार शंभुनाथ सिंग, २७ राहणार गौतम नगर मुंबई,

रज्जोबाली राजन मुल्ला शेख, २९ राहणार बैल बाजार कुर्ला तर गाडीचा माल यज्ञेश हिरा वाघेला, २७ दांडपाडा खार मुंबई येथील रहिवासी असून हे तिघेही चांगले मित्र आहेत हे निष्पन्न झाले. यावरुन पोलिसांनी तपास सुरु केला.

सोमवारी २ जून रोजी रात्री ९ वाजताच्या सुमार हे तिघं मित्र यज्ञश वाघेला याचे पाहुणे अनिकेत खोपकर यांची मारुती रिस्ट कार घेऊन त्र्यंबकेश्वर येथे देवदर्शनासाठी चालले होते. कसारा जवळील उंबर माळी येथे रात्री उशिरा त्यांच्या गाडीचा अपघात झाला असावा असा पोलिसांचा अंदाज आहे. दोन दिवस तिघांचे ही फोन लागत नव्हते व ते घरी परत आले नाहीत म्हणून तीघांच्या ही घरच्यांनी पोलिसांत मिसिंग दाखल केली. खार पोलिस स्टेशन ठाण्यात यज्ञशची व प्रविणची पवई पोलिस ठाण्यात तर विनोबा भावे पोलिस ठाणे, कुर्ला येथे रज्जोबाली शेखची मिसिंग दाखल करण्यात आली होती. जवळ जवळ पाच दिवस हे मृतदेह याच गाडीत होते. अपघात झाला त्यावेळी हे तीचे जखमी अवस्थेत देखील असतील. परंतू त्यांना वेळेवर मदतन मिळाल्यामुळं देखील त्यांचा मृत्यू झाला असावा असा कयास देखील लावला जात आहे. या घटनेमुळे या तीन्हा परिवारात दुःखाचा वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा कसारा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## श्रीनाथच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : श्रीनाथ प्रतिष्ठानच्या वतीने लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्त दि.०५ जून २०२५ रोजी डॉ. संगीता रावत अधिष्ठाता के.ई.एम.रुग्णालय यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ.जयश्री शर्मा विभाग प्रमुख रक्तपेढी, सविता नितनवरे समाजविकास अधिकारी रक्तपेढी के.ई.एम.रुग्णालय तसेच त्यांच्या वैद्यकीय स्टाफ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे के.ई.एम रुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून न्यूज १८ लोकमतचे वरिष्ठ निवेदक विलास बडे हे उपस्थित होते. यावेळी के.ई.एम हॉस्पिलचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. मोहन देसाई, उपअधिष्ठाता डॉ. मनोज तेलकटवार,डॉ रोशन वाडे, स्थानिक आमदार अजय चौधरी, भोईवाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पो.निरी. सचिन कदम यांनी शिबीरास भेट देऊन रक्तदानाविषयी महत्त्व पटवून दिले. सदर रक्तदान शिबारात एकूण १३६ नागरिक रक्तदाना करण्याकरिता उपस्थिती नोंदवली. त्यापैकी १०६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. व काही वैद्यकीय कारणास्तव ३० लोकांचे रक्त प्राथमिक तपासणीनुसार घेता आले नाही.

सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण बांगर, प्रशासकीय अधिकारी राजेश कुऱ्हाडे, दि म्युनिसिपल को.ऑप.बँक लि.मुंबई संचालक जालंदर चकोर, माजेद शेख, प्रशांत कराड, विजय केंद्रे, बालाजी मुंडे, सुमित पिंपळे, भाग्यश्री सानप, महादेव वारे सह सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले.

रुग्णालयाचे हृदय म्हणून ओळखली जाणारी के. ई.एम.रक्तपेढी हि नेहमीच रक्तदान शिबिरासाठी अग्रेसर असते. सदर रुग्णालयामध्ये थॅलेसेमिया रुग्ण वयाच्या पाच वर्षापासून ते वयस्कारांपर्यंत ३५० ची संख्या असून हार्ट सर्जरी, ब्रेन सर्जरी, हाडांच्या अनेक प्रकारच्या सर्जरी डायलिसिससाठी रुग्ण देशाच्या कानाकोपऱ्यामधून रुग्णालयामध्ये येऊन उपचार घेतात व निरोगी होऊन घरी जातात ही सेवा पूर्णपणे मोफत असते.

## खडवलीत आदिवासी वस्तीत ताडपत्री वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खडवली : सामाजिक बांधिलकी जपत सुयोग टेलिमॅटिक्स लिमिटेड, मुंबई यांचे डायरेक्टर शिवशंकर लातुरे यांच्या सौजन्याने खडवली परिसरातील फळेगाव आदिवासी वस्ती, बेलपाडा येथे गरजू नागरिकांना ताडपत्री वाटप



करण्यात आले. तसेच खाकरवाडी जिल्हा परिषद शाळा येथेही ताडपत्री देण्यात आले.

या उपक्रमासाठी भागुबाई जीवन प्रेरणा सामाजिक संस्था, फळेगाव यांचे विशेष सहकार्य लाभले. संस्थेचे अध्यक्ष मा. संजय गोमा जाधव यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. माजी चंद्रकांत भोईर, फळेगाव ग्रामपंचायत सदस्य महेश आगिवले , पंकज पाटील अशोक चौधरी, पत्रकार विलास भोईर, विराज जाधव यांचीही यावेळी विशेष उपस्थिती होती.

या उपक्रमामुळे पावसाळयाच्या तोंडावर आदिवासी वस्तीतील नागरिकांना दिलासा मिळाला असून, स्थानिकांनी उपक्रमाचे मनःपूर्वक स्वागत केले.

## प्रत्येक दिवस स्वयंप्रशिक्षणाचा दिवस

**- महापालिका आयुक्त अभिनव गोयल**



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : प्रत्येक दिवस हा स्वयंप्रशिक्षणाचा/अनुभवाचा दिवस असतो आणि शाळांमध्ये ही संकल्पना रुजवणे गरजेचे आहे असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले ,कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि पर्यावरण दक्षता मंडळ, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवली येथील बालभवन येथे आयोजलेल्या निसर्गोत्सव कार्यक्रमात उपस्थित संबोधित करताना त्यांनी हे प्रतिपादन केले. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड पर्यावरण दक्षता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम काळे, महापालिकेचे माजी पदाधिकारी मंदार हळबे ,पर्यावरण विभागाचे उपायुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, सहा.-आयुक्त हेमा मुंबरकर व्यासपीठावर उपस्थित होत्या.

निसर्गोत्सवात कलात्मक रीतीने प्रदर्शित केलेल्या वेगवेगळया झाडांबाबत, छायाचित्रांच्या प्रदर्शनाबाबत पर्यावरण दक्षता मंडळाचे अभिनंदन करत तुम्ही आमच्यासाठी ब्रँड अँबेसिडर आहात अशा शब्दात आयुक्तांनी प्रशंसा केली. पर्यावरण दक्षता मंडळांने डोंबिवलीतील काही जागा(spots) निश्चित करण्यात, त्या परिसरात महापालिकेसोबतच वृक्ष लागवड करण्याचा, हिरवाई निर्मितीचा प्रयत्न करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. घराघरांतून छोट्या ऍक्टिव्हिटी म्हणजे पाण्याची बचत, वस्तूंचा पुनर्वापर, प्लास्टिकचा कमीत कमी वापर या बाबी लहान मुलांपर्यंत पोहोचायला हव्यात असे ते पुढे म्हणाले.

यावेळी या निसर्गोत्सवात सहभागी झालेल्या आणि सहकार्य करणाऱ्या लहान मुलांचा आणि इतर व्यक्तींचा मान्यवरांचे हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यावरण दक्षता मंडळाच्या रूपाली शाईवाले यांनी केले.

आज आणि उद्या म्हणजे दि.८ जून रोजी डोंबिवलीतील बालभवन येथे आयोजिलेल्या या निसर्गोत्सवात बागकाम कार्यशाळा( किचन गार्डन आणि फुलझाडे )सर्पमित्र गप्पा असे अनेकविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच पर्यावरण पूरक उत्पादनाचे स्टॉल्स आणि आणि आसपासच्या परिसरातील जैवविविधता दर्शवणाऱ्या निसर्ग फोटोंचे प्रदर्शनही लावण्यात आले आहे.

## वक्फ संपत्तीच्या नोंदीसाठी 'उम्मीद' पोर्टल सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : वक्फ संपत्तीचे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यासह त्याची नोंद ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून 'उम्मीद' नावाचे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. नियमानुसार सहा महिन्यांच्या आत वक्फ संपत्तीची नोंदणी या पोर्टलवर करावी लागेल.वक्फ संपत्तीच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्याच्या अनुषंगाने हे पोर्टल सुरू करण्यात आल्याचे अल्पसंख्याक खात्याचे मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितले. सर्व वक्फ संपत्तींच्या विश्वस्तांना वक्फ संपत्तीबाबत 'उम्मीद' पोर्टलवर सहा महिन्यांत नोंदणी करावी लागेल. यात जिओटॅगिंग आणि डिजिटायझेशनचा समावेश आहे.निर्धारित वेळेत ज्या वक्फ संपत्तीची नोंदणी केली जाणार नाही, त्यांना बेकायदा जाहीर केले जाईल आणि ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित लवादाकडे पाठवली जातील. पोर्टलच्या माध्यमातून जनजागृतीसाठी आवश्यक ती मदत आणि सेवा प्रदान केली जाणार आहे.

## बससेवेअभावी प्रवासी त्रस्त

**संतप्त प्रवाशांचा आंदोलनाचा इशारा**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : खेड्यापाड्यात तसेच ग्रामीण भागात गरीब जनतेची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी ती म्हणजे " महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाची बस वाहतूक सुविधा," आजमितीस ही वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली आहे.याला जबाबदार एस्.टी. महामंडळ प्रशासन आहे.उदा.द्यायचे झाल्यास ठाणे जिल्ह्यातील भिवंडी,कल्याण,ठाणे या शहरीकरणाच्या बस स्थानकात असंख्य प्रवासी दररोज नोकरी,व्यवसाय,शिक्षणानिमित्ताने प्रवास करीत आहेत,परंतु सद्यस्थितीत संबंधित स्थानकात तासनतास थांबून बसेसची गैरसोय होत आहे,त्यामुळेच येथील प्रवाशी दररोजच्या या गैरसोयीला कंटाळून संतप्त प्रतिक्रिया "दैनिक पुढारी " वृत्तप्रतिनिधी यांच्याकडे व्यक्त करताना अशाही आपल्या समस्यां सांगतात की,शौचालये,मुता-या,पिण्याचे पाणी तसेच अस्वच्छता आदि महत्त्वपूर्ण सुविधांचा अभाव असून, प्रवाशांची गैरसोय तर आहेच,परंतु खऱ्या अर्थाने अवहेलना आहे.त्यातच महिलांसाठी



अर्धे तिकीट सुविधा असल्यामुळेच एकूण प्रवाशांपैकी महिलां प्रवाशांची संख्या अधिकच आहे.

याबाबत संबंधित बसस्थानक व्यवस्थापन यांच्याकडे चर्चा करताना अशी माहिती प्राप्त होते की,खराब रस्ते, अपुरा कर्मचारीवर्ग व जुन्या बसेस यामुळेच 50% बसेस पूर्वीपेक्षा कमी केल्या आहेत.त्यासाठी आमच्या हातात काही नाही,तुम्ही आमच्या वरिष्ठांकडे किंवा शासनाकडे याबाबत तुमचे गाऱ्हाणे मांडा अशा स्पष्ट शब्दांत सांगितले जात आहे.

या ठिकाणी प्रवाशांची संतप्त प्रतिक्रिया आहे की,एस्. टी. महामंडळाला प्रवाशांची गरज आहे की,नाही ? तसेच प्रवाशी बसमधून फुकट प्रवास करीत आहेत का? त्याचबरोबर महामंडळांच्या हलगर्जीपणामुळे खाजगी वाहतूक व्यवस्था वाढीस कारणीभूत एस्. टी.महामंडळ प्रशासन जबाबदार आहे,असे स्पष्टपणे दिसून येत आहे.

तरी एस्.टी.महामंडळाने आपला गलथान कारभार वेळीच सुधारून प्रवाशांची गैरसोय तसेच अवहेलना थांबवावी.अन्यथा ठिकठिकाणी प्रवाशांना आंदोलने करणे भाग पडेल.





# अनाधिकृत बांधकामांवर पालिकेचा हातोडा..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : कल्याण तालुक्यातील बल्याणी, उंभार्णी, वासुंदरी रोड व टिटवाळा येथील बांधकामांवर पालिकेची धडक कारवाई करत अनेक रूम व जोत्यांचे बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली. अ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी ही धडक कारवाई केली आहे. शासकीय सुट्टी असल्याने बांधकाम व्यावसायिक जोरात बांधकामे करत असतात. बकरी ईदची सुट्टी असल्याने मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने ही अनाधिकृत बांधकामे या कारवाईत तोडण्यात आलेली आहेत. या कारवाईमुळे अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यवसायिकांचे मात्र धाबे दणाणले आहेत. अशा प्रकारची सुट्टीच्या दिवशी कारवाई सतत सुरू राहील अशी माहिती पाटील यांनी दिली.

# हुतूतू ते कबड्डी खेळाचे महत्त्व

मानवाच्या अवस्था म्हणजे बालपण तरुणपण आणि वृद्धपण या तिन्ही अवस्थांमध्ये खेळाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. ज्यांनी खेळ खेळलाच नाही असा एकही माणूस या पृथ्वीतलावर सापडणार नाही इतके खेळाचे महत्व आहे. खेळामध्ये मैदानी खेळ, घरातील खेळ, संकुचित जागेतील खेळ मग ते वैयक्तिक असो व सांघिक असो असे खेळ खेळले जातात. प्रत्येक माणूस आपल्या शारीरिक कुवतीप्रमाणे खेळाची निवड करतो.

आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे त्याचे सर्व जीवन पाऊस व शेतीवर अवलंबून आहे. आपल्या देशात यांत्रिक प्रगती झाली नव्हती त्यामुळे लोक अति श्रीमंत व अति गरीबही नव्हते.त्यांच्या गरजाही मर्यादित होत्या. त्यांनी खेळाची निवड करताना कमी खर्चिक खेळ निवडले जसे की विटी दांडू, लगोरी, हुतूतू ,खोखो, आटापाट्या यासारख्या खेळांची निवड केली. लगोरी मध्ये चेंडू लागत होता त्यावर उपाय म्हणून चिंध्या बांधून चेंडू तयार करीत व त्याने लगोरीचा आनंद घेत. खेळात मिळालेला आनंद महत्त्वाचा खेळातील वस्तूला महत्त्व नव्हते.

त्यावेळी सांघिक खेळामध्ये जास्तीत जास्त हुतूत खेळाकडे नागरिकांचा ओढा होता. हा खेळ गावागावात सामने भरून खेळला जायचा. त्याचे स्वरूप ही साधारण असायचे. त्याला सार्वजनिक स्वरूप नव्हते त्यावेळी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली नव्हती 20 सप्टेंबर 1955 पूर्वी होतो हा सांघिक खेळ होता. मुंबई राज्य होते मुंबई राज्य कबड्डी संघटनेची सरकार्यवाह शंकरराव साळवी म्हणजेच बुवा साळवी हे होते. 20 सप्टेंबर 1955 साली कुलाबा कबड्डी फेडरेशनची स्थापना झाली. तेव्हा कुलाबा जिल्हा होता आजचा रायगड जिल्हा आहे. पहिले अध्यक्ष स.वी. कुंटे झाले सरकार्यवाह मनोहर मोहिते झाले तेव्हापासून कबड्डीचे काम आपल्या रायगड जिल्ह्यात सुरू झाले. 30 ऑगस्ट 1968 साली मनोहर मोहिते मुंबईत गेले व तदनंतर संघटनेचे काम बंद पडले त्यामुळे कबड्डी संघांना निरनिराळ्या अडचणींना तोंड द्यावे लागले सन1969 साली नवीन कार्यकारणीची निर्मिती झाली प्रभाकर पाटील अध्यक्ष झाले नथुराम पाटील हे उपाध्यक्ष झाले सरकार्यवाह चंद्रकांत जयवंत यांना निवडण्यात आले. संघटनेची सूत्रे तरुण कार्यकर्त्यांवर सोपवल्यामुळे कबड्डीचे जणू सुवर्णयुग निर्माण झाले.कबड्डीचा विस्तारअलिबाग, पेण, पनवेल, रोहा येथे झपाट्याने झाला याचे पूर्णपणे श्रेय प्रभाकर पाटील यांना जाते.कारण याच काळात हुतूतू ते कबड्डी खेळाला नवी उभारी देण्याचे काम कै.प्रभाकर पाटील यांनी केले.

रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने अलिबाग पेण तालुक्यात कबड्डीचा प्रचार प्रसार झपाट्याने झाला. सन 1960 ते 2000 या 40 वर्षांच्या कबड्डीच्या सुवर्णकाळात हा कबड्डीचा सुवर्णकाळ समजल्यास अतिशयोक्ती होणार नाही त्यावेळी अलिबाग मध्ये पुष्कळ बलाढ्य संघ होते. त्यांनी आपल्या गावात कबड्डी सामने भरून एक प्रकारची ऊर्जा निर्माण केली. काही गावातील सामने तर चार चार ग्राउंड वर खेळवले जायचे. 32 ते 64 संघ एकावेळी सामन्यात भाग घ्यायचे. 1965 ते 90 पर्यंतच्या काळात स्वर्गीय प्रभाकर पाटील व नथुराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जी कबड्डीला उभारी आली त्याचाच वारसा कै. भाई मोहन पाटील यांनी तन-मन धनाने पुढे चालविला. यामुळेच अनेक कबड्डीचे मातब्बर संघ व खेळाडू उदयास आले त्याचा लेखाजोगा देताना अतिशय आनंद होत आहे. त्यावेळी अलिबाग तालुक्यातील कुर्डूसचा मातृछाया हा संघ फार आघाडीवर होता याचा संपूर्ण तालुक्यात दबदबा होता मातृछाया संघ म्हटला की त्याचे दोन कोपरे रामचंद्र केणी व भगवान पिंगळे. यांचे मगर मिठीतून सहसा खेळाडू बाहेर पडत नसत, डोळ्यांनी त्यांचा वेध घेत असत तसेच चढाई करणारे जनार्दन पिंगळे व दत्ता पिंगळे हमखास गुण मिळवण्यात पटाईत होते.सांघिक खेळाच्या जोरावरच त्यांनी संपूर्ण रायगड जिल्ह्यातील सामन्यात अंतिम विजेत्याची बक्षीस आणली. अंतिम विजयाची 30 बक्षिसे म्हणजे ढाली आज ही कुर्डूसच्या श्री हनुमान मंदिरात आहेत. त्यावेळी विजयी संघास ढाली दिल्या जायच्या. आजच्या सारख्या कप व ट्रॉफी नव्हत्या. अलिबाग मधील इतर मातब्बर संघ व त्यांचे खेळाडू बघितले तर विकास मेढेखार, अमृत पाटील, राम थळे, परशुराम थळे ,झुंजार पोयनाड प्रकाश चवरकर, वादळ क्लब शहाबाज सुधीर पाटील टि.डी.पाटील सर, संत तुकाराम देहन ल.क. पाटील, चौकीचा पाडा वि.सू प्रतिज्ञा, बांधण समजीसकर म्हसोबा शहापूर, प्रसाद क्रीडा मंडळ रेवदंडा प्रभाकर पाटील शिवाजी संघ नागाव मनोहर गुरव, श्रीराम कमळ पाडा लक्ष्मण बैकर, विनायक दिवलांग दिलीप धुमाल, धारेश्वर संघ सांबरी, नवगाव कठोर बंधू तसेच पेणमध्ये झुंजार कणे देविदास म्हात्रे, कालभैरव बोर्झे विजय म्हात्रे, नवतरुण करावी संजय मोकल, विजय शेतकरी बेणेघाट प्रमोद म्हात्रे, हनुमान क्रीडा मंडळ बोरी संजय म्हात्रे ,अष्टविनायक कोळवे आशिष म्हात्रे, वायुसूत ओढांगी, वाशी, कासू, पांडापूर गडब असे नावाजलेले संघ होते.

याच काळात रायगड जिल्ह्याचा संघ प्रौढ कबड्डी संघाने महाराष्ट्राचे अजिंक्यपद 1992 साली नगर येथे 1993 साली कोल्हापूर येथे पटकावले कुमार कबड्डी संघाने 1975 साली श्रीरामपूर येथे 1976 साली बीड येथे 1977 साली पुणे येथे अजिंक्यपद मिळवून हॅट्रिक साधली. हे विजय रायगडला भूषणावह असून पुढील वाटचालीस कारणीभूत ठरली. त्यामुळेच 1995 -96 सुधीर पाटील वादळ क्लब शहाबाज ,1996- 97 संजय म्हात्रे, हनुमान संघ बोरी 1997-98 प्रमोद म्हात्रे ,विजय शेतकरी संघ बेणेघाट तर 1985- 86 विजय म्हात्रे काळभैरव संघ बोर्झे,यांना महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मिळाला असून रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.गेला एवढेच नव्हे तर महाराष्ट्र कबड्डी संघाचे कर्णधार विजय म्हात्रे कालभैरव संघ बोर्झे व सुधीर पाटील वादळ क्लब शहाबाज या दोघांना कर्णधार पदाचा लाभ मिळाला. याच काळात पंचांची उणीव भासत असताना कबड्डी पंच परीक्षा पास होऊन भरून काढली तेव्हा राष्ट्रीय पंच परीक्षा पास झाले त्यांची नावे गावासह बघितली सर्व गजानन मोकल करावी, पंढरीनाथ पाटील बेलकडे, पांडुरंग पाटील करावी, रमाकांत जुईकर शहाबाज, हिरामण भोईर पिंपळपाडा, रमेश म्हात्रे गडब, गणपत मेंगाळ पेझारी, जनार्दन पाटील पेझारी, राम भोईर पिंपळपाडा, दीपक मोकल रेवदंडा, रवींद्र म्हात्रे खोपोली, शरद कदम वनवठे अशी झेप आपल्या रायगड जिल्ह्याने घेतली.

अशा आपल्या गाव खेळाला कमी खर्चिक पण दर्जेदार व दमदार खेळाला अखेर ऑलिंपिक मंडळाने स्थान दिले. येथे कबड्डीचा विजय झाला म्हणजेच आपल्या देशाचा विजय झाला. अनेक देशाच्या संघानी ऑलिंपिक कबड्डी स्पर्धेत भाग घेतला तरी आपल्या भारताला कबड्डी चॅम्पियनशिपचा मान मिळाला एवढेच नव्हे तर ज्या इंग्रजांनी क्रिकेट सारख्या खर्ची खेळाला जन्म दिला त्याच ब्रिटिशांच्या खेळात भारताने चॅम्पियन ट्रॉफी आपणाकडे राखली हे अभिमानास्पद आहे .खेळ कोणताही असो आपला भारत मागे राहणार नाही

खेळ कबड्डीचा थरार
भारत मागे नाही हटणार

लेखक
गिरीधर पिंगळे गुरुजी
गोरठण बुद्रुक खालापूर
मो. ९८२३७७९६०६

# आंबिवलीत स्टेशन परिसर होतोय जलमय

## नागरिक त्रस्त, प्रशासनाविरोधात संतापाचा उद्रेक..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



टिटवाळा : आंबिवली रेल्वे स्थानकाच्या पूर्व भागात दरवर्षी पावसाळा आला की रस्त्यावर साचणाऱ्या पाण्याचे विदारक दृश्य पाहायला मिळते. रिक्षा स्टँडसमोरचा मुख्य मार्ग म्हणजे टिटवाळा, मोहने, आंबिवली व बिर्ला कॉलेजमार्गे जाणाऱ्या हजारो नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाची कणा; मात्र तिथेच पावसात साचणाऱ्या पाण्यामुळे हीच वाट रोजची डोकेदुखी ठरतेय.

गेल्या काही वर्षांपासून पावसात या रस्त्यावर पाणी साचते आहे. नागरिक, वाहनचालक आणि रिक्षाचालक अक्षरशः हैराण झाले आहेत. वाहनांची कोंडी, रिक्षा बंद, आणि पादचाऱ्यांची तारांबळ यामुळे त्रस्त जनतेचा संताप आता उफाळून आला आहे.

"गटारच गायब!" – अदानी प्रकल्पामुळे समस्या वाढली? : स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी याठिकाणी मोठी गटार व्यवस्था होती. मात्र, अदानी ग्रुपच्या सध्या सुरू असलेल्या विकास प्रकल्पामुळे ती गटार बंद करण्यात आली आणि त्यातूनच ही समस्या निर्माण झाली आहे. पाणी वाहून जाण्याचा मार्गच नष्ट झाला असल्यामुळे आता थेट मुख्य रस्त्यावरच तलाव तयार होतोय.

"प्रशासन फेल! – नागरिकांची घणाघाती टीका" : संतप्त नागरिक म्हणतात, "रिक्षाचालक स्वतः चौकात उभे राहून पाणी उपसतात, ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे! रस्त्यांची ही अवस्था आहे, मग गल्लीबोळांची काय स्थिती असेल?" महानगरपालिकेचे जलनिस्सारण, मलनिस्सारण विभाग आणि नालेसफाई करणारे ठेकेदार कुठे आहेत, असा सवाल विचारण्यात येतो आहे. अनेकांनी तर 'त्या अधिकाऱ्यांना या पाण्यात बुडवले पाहिजे' अशी टोकाची टीका केली आहे.

"तात्काळ कारवाई करा!" – समाजसेवकांचा इशारा : समाजसेवक दिपक सकपाळ यांनी म्हटले की, "या भागात जलनिस्सारणाची योग्य व्यवस्था करणे, बंद झालेल्या गटार मार्गांची चौकशी, नवीन गटारींची रचना व नियमित नालेसफाई यासाठी स्वतंत्र पथक तयार करणे आवश्यक आहे. नागरिकांचा संताप उफाळण्याआधी प्रशासनाने जबाबदारी पार पाडावी." पावसाळा जोर धरतोय आणि रस्त्यावर तलाव निर्माण होतोय. आता प्रश्न फक्त रस्त्यांचा नाही, तर प्रशासनाच्या इच्छाशक्तीचा आहे. वेळेवर उपाययोजना झाली नाही, तर या पाण्याच्या डबक्यात महानगरपालिकेचा प्रशासनही विश्वास गमावेल, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.




# कल्याणमध्ये क्रेसमंडवर्ल्ड स्कूलचे भव्य उद्घाटन

## मुंबईनंतर कल्याणमध्ये शिक्षणाचा एक नवा वेगळा अध्याय सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याणच्या शैक्षणिक क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण प्रसंग आला असून उत्कृष्टतेचे संगोपन करण्यासाठी आणि भविष्यातील जागतिक नागरिकांना सक्षम करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या क्रेसमंडवर्ल्ड स्कूल, कल्याण या नवीन स्कूलचे गुरुवारी उद्घाटन झाले. फिनलंडचे कौन्सिल जनरल एरिक अफ हॅलस्ट्रॉम, संस्थापक ट्रस्टी जितेंद्र देवूळकर आणि अनिता देवूळकर यांच्या उपस्थितीत. त्यांच्यासोबत व्यवस्थापनाचे सदस्य प्रदीप मुद्रास आणि दिप्ती सावंत, कुटुंबातील सदस्य, कर्मचारी आणि क्रेसमंडवर्ल्ड, कल्याणचे विद्यार्थी देखील उपस्थित होते. योगीधाममधील शाळेच्या परिसरात झेंडे फडकल्याने उत्सवाचे वातावरण होते आणि प्रशस्त परिसर विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीचे स्वागत करण्यात आले.

कल्याणमधील क्रेसमंडवर्ल्ड स्कूल हे क्रेसमंडवर्ल्ड ऑफ स्कूल्सच्या बॅनरखाली दुसरे कॅम्पस आहे. अंधेरी येथील त्यांच्या प्रमुख शाळेच्या उल्लेखनीय यशानंतर, ज्याने आधीच शैक्षणिक कठोरता, समावेशक शिक्षण आणि भविष्यासाठी तयार अध्यापनशास्त्र यासाठी प्रतिष्ठा मिळवली आहे. शिक्षणाकडे फिनिश दृष्टिकोनावर भर देणे हे क्रेसमंडवर्ल्ड ग्रुप ऑफ स्कूल्सचे एक उत्कृष्ट वैशिष्ट्य आहे. शांत परिसरात, अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि सुविधांसह जागतिक दर्जाचे शिक्षण दिले जात आहे. व्हिजन स्टेटमेंट हे सर्व सांगते - विद्यार्थ्यांना 'नवोपक्रम, सहकार्य' आणि विविधतेची संस्कृती जोपासून जागतिक उत्कृष्ट माणूस,नेता बनण्यास सक्षम करणे.

संस्थेमागील प्रेरक शक्ती म्हणजे विश्वस्तांचे सामूहिक दृष्टिकोन ज्यांच्या वचनबद्धतेने हे स्वप्न प्रत्यक्षात आणले आहे. प्रत्येक विश्वस्त समग्र शिक्षणाच्या कारणासाठी एक अद्वितीय दृष्टीकोन आणि अटळ समर्पण आणतो. जितेंद्र देवूळकर हे क्रेसमंडवर्ल्ड स्कूलच्या तत्वज्ञानामागील प्रमुख दूरदर्शी आहेत. अनिता देवूळकर, या स्वप्नाच्या पंखांखालील विद्यार्थ्यांसाठी एक वारा आहेत, जे प्रत्यक्षात उतरले आहे. दिप्ती सावंत यांनी सर्वांगीण यश मिळवण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. कल्याण टीमचे नेतृत्व प्राचार्य करतात. हर्षिता शेट्टी, एक तरुण आणि गतिमान शिक्षणतज्ज्ञ, त्यांच्या शिक्षणशास्त्रीय टीमसह कार्यरत असतात.

"आकांक्षा" साध्य करा! प्राप्त करा !!" या मार्गदर्शक तत्त्वासह, क्रेसमंडवर्ल्ड स्कूल मूल्य-आधारित शिक्षण, २१ व्या शतकातील कौशल्ये आणि जागतिक नागरिकत्वावर भर देते, जे एनइपी NEP चे अत्यंत आवश्यक ध्येय आहे. शाळा एक प्रगतिशील अभ्यासक्रम, अनुभवी शिक्षक आणि एक संगोपन करणारे वातावरण असे देते जे विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यास मदत करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

# पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज

## - नरेंद्र पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामिण (नरेंद्र पाटील) : पृथ्वी वरील बिघडलेले पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी अधिकाधिक प्रमाणात वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी व्यक्त केले. निमित्त होते ते जागतिक पर्यावरण दिनाचे आणि युवा कार्यकर्ता विवेक गायकर व बिर्ला कॉलेज महाविद्यालय याच्या वाढदिवसानिमित्त कल्याणातील सुप्रसिद्ध एल. डी.सोनावणे महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण उपक्रमाचे.

यंदा 100 वर्षांच्या इतिहासात प्रथमच जून महिन्यात पडणारा पाऊस मे महिन्यातच बरसला. देशातील शास्त्रज्ञांच्या मते हे निसर्ग आणि पर्यावरणाच्या दृष्टीने चांगले लक्षण नसून निसर्ग यातून आपल्याला धोक्याचे संकेत देत आहे. मात्र या सर्वातून पुढच्या पिढीसाठी एक चांगले आयुष्य द्यायचे असेल तर वृक्षारोपणाशिवाय कोणताही पर्याय नसल्याचे नरेंद्र पवार यांनी यावेळी अधोरेखित केले. तर वाढते वायू प्रदूषण आणि त्यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक इंधनांचा प्रचंड वापर पाहता सध्या पृथ्वीवर अस्तित्वात असलेली ही पारंपरिक ऊर्जा ही पुढील काही वर्षेच टिकू शकणार आहे. ते पाहता नविन अभ्यासानुसार या इंधन स्रोतांपेक्षा बांबूच्या झाडांमध्ये अधिक ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता असल्याचे आढळून आल्याची माहिती पर्यावरण क्षेत्रात कार्यरत माजी आमदार पाशाभाई पटेल यांनी दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बांबूच्या या गुणधर्माच्या पार्श्वभूमीवर पालघरसारख्या ठिकाणी तब्बल 1 लाख एकरावर बांबूची लागवड करण्याचा संकल्प शासनाकडून करण्यात आला आहे. आजच्या पर्यावरण दिनाचे औचित्य साधून या बांबू लागवडीच्या उपक्रमाला पालघरमध्ये प्रारंभ करण्यात आला आहे. तसेच निसर्गाचा आणि पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी बांबू लागवडीचा कार्यक्रम हा आम्ही अर्थ सेव्हर मिशन म्हणून स्विकारण्यात आला आहे. आणि जेणेकरून आपली पुढची पिढी जगण्यासाठी या मिशनमध्ये आपल्या सर्वांना सहभागी व्हावेच लागेल असे आवाहनही नरेंद्र पवार यांनी यावेळी उपस्थितांना केले.

नरेंद्र पवार यांनी वृक्षारोपण करत स्वीकारले झाडाचे पालकत्व...

दरम्यान आज असलेला जागतिक पर्यावरण दिनाचे आणि युवा कार्यकर्ता विवेक गायकर व बिर्ला महाविद्यालयातील जीएस खुशनूर खान यांच्या वाढदिवसानिमित्त एल. डी.सोनावणे महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. माजी आमदार नरेंद्र पवार यांनीही एक झाडाचे रोपटे लावून त्याचे आपण पालकत्व स्वीकारत असल्याचे जाहीर केले. तसेच इतरांनीही आपापल्या झाडाचे पालकत्व स्वीकारण्याचे त्यांनी आवाहन केले. यावेळी एल.डी.सोनावणे महाविद्यालयाच्या प्राचार्य ऍना अँथनी, भाजपचे माजी शहराध्यक्ष वरुण पाटील, विनोद राजपूत सर, विवेक गायकर, खुशनूर खान, गणेश मोटे, गिरीष ज्यूरियानी, किमया जुन्नरकर, पल्लवी पाटील, प्रथमेश पांजरी, जयेश जगदाने, यश निंबाळकर यांच्यासह महाविद्यालयाचा शिक्षक वर्ग व बिर्ला कॉलेज मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# पारगावमध्ये 'हरित समृद्ध गाव' उपक्रमाला सुरुवात!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड(बाळासाहेब भालेराव) जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने ता.५जून २०२५ रोजी किसळ - पारगाव ग्रामपंचायतीत एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले. २००० झाडांची सामूहिक लागवडी द्वारे हरित समृद्ध गाव या दीर्घकालीन संकल्पनेचा प्रारंभ करण्यात आला. इंप्का, ग्रामपंचायत किसळ-पारगाव आणि आरएससीडी (रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेवलपमेंट) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. सरपंच डॉ. कविता यांच्या हस्ते सागवान वृक्ष लागवड करून या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ग्रामपंचायत ग्रामसेविका, ग्रामपंचायत सदस्य, पेसा मोबिलायझर, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, शेतकरी वर्ग, जैवविविधता समिती सदस्य व प्रतिनिधी आणि गावातील स्त्री शक्ती उत्स्फूर्तपणे सहभागी झाली होती. एकूण ५० हून अधिक शेतकरी आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाला सक्रिय पाठिंबा दिला. या मोहिमेचा उद्देश केवळ झाडे लावणे नसून, ग्रामविकासात पर्यावरणपूरक दृष्टीकोन रुजवणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संपत्ती जपणे हा आहे. स्थानिक परिस्थितीनुसार व पर्यावरण पूरक अशी उपयुक्त झाडांची निवड करून लागवड केली जाणार आहे.

संपूर्ण जून महिन्यात गावात विशेष सागवान लागवड मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये शोधिनी गट, ग्राम जैवविविधता समिती, शेतकरीवर्ग, तरुण वर्ग व महिला बचत गट सहभागी होणार आहेत. या उपक्रमामुळे किसळ - पारगाव केवळ नकाशावर हिरवे होणार नाही, तर पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातूनही आदर्श गाव म्हणून पुढे येईल, असा विश्वास ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# बापानेच केली पोटच्या मुलीची हत्या

## आरोपी अटकेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील वडखळ पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या पाबळ येथील देवमाळ ठाकूरवाडी येथे राहाणाऱ्या हैवान बापाने आपल्या १ वर्षाच्या मुलीला रागाच्या भरात घरातील फरशीवर आपटून मारल्याची खळबळ जनक घटना घडली असून आरोपी बापाला वडखळ पोलिसांनी अटक केली आहे तर आरोपीला अलिबाग येथील पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार देवमाळ ठाकूरवाडी येथे राहणारा आरोपी सुरेश पद्या दोरे (वय ४० वर्षे) हा रागीट स्वभावाचा असल्याने त्याचे कोणाबरोबर पटत नव्हते तर त्याच्या दोन बायका ही त्याला सोडून गेल्या होत्या तर त्याची तिसरी बायको ही दीड महिन्यापासून त्याला सोडून गेली होती. तेव्हापासून त्याच्याकडे ४ मुले राहात होती यातील १ वर्षाच्या मुलीला (विजया उर्फ बेबी) हिला हैवान बापाने (सुरेश दोरे याने) फरशीवर आपटून मारल्याची घटना १ जून रोजी घडली असून वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे. अधिक तपास वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.




जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024